नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 । पाने : ५ । वर्ष : ४ थे । अंक : २९१ । किंमत : ४ रूपये
Gmail : aklgavakari@gmail.com
Gmail : punegavkari@gmail.com




महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक

# समर्थ गांवकरी

संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे  POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026




मंगळवार दि. ०६ ऑक्टोंबर २०२६

मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

# जिल्हा बँक निवडणुकीत अमित भांगरे यांचे शक्तिप्रदर्शन

## शेकडो कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत उमेदवारी अर्ज दाखल!

**अकोले (समर्थ गांवकरी)**

अहिल्यानगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या पंचवार्षिक निवडणुकीसाठी जिल्हा बँकेचे माजी सर्वात तरुण संचालक तथा राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अहिल्यानगर युवक जिल्हाध्यक्ष अमित अशोकराव भांगरे यांनी आज मोठ्या शक्तिप्रदर्शनासह आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. विशेष म्हणजे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या उपस्थितीत रविवारी अकोले येथे टंचाई आढावा बैठक पार पडली. या बैठकीनंतर दुसऱ्याच दिवशी भांगरे यांनी शेकडो समर्थकांसह जोरदार शक्तिप्रदर्शन करत निवडणूक कार्यालयात हजेरी लावल्याने अकोलेच्या राजकीय वर्तुळात या घडामोडीची चर्चा रंगली आहे.

आपले वडील स्वर्गीय अशोकराव भांगरे यांचा फोटो हातात घेऊन अमित भांगरे वाजत-गाजत निवडणूक कार्यालयात दाखल झाले. यावेळी शेकडो कार्यकर्ते, महाविकास आघाडीचे पदाधिकारी, नेते आणि समर्थक मोठ्या संख्येने उपस्थित होते. दादाभाऊ कळमकर, अशोक बाबर, जिल्हाध्यक्ष काकडे यांच्यासह अनेक मान्यवरांनी यावेळी उपस्थित राहून भांगरे यांच्या उमेदवारीला पाठिंबा दिला. कार्यकर्त्यांच्या घोषणांनी परिसर दणाणून गेला होता.

अगस्ती सहकारी साखर कारखाना आर्थिक अडचणीत असताना त्याला जिल्हा बँकेकडून मदत मिळावी यासाठी अमित भांगरे यांनी संचालक म्हणून प्रयत्न केले होते. सहकार क्षेत्रातील अनुभव, युवकांशी असलेला संपर्क आणि स्वर्गीय अशोकराव भांगरे यांच्या कार्याचा वारसा या पार्श्वभूमीवर त्यांनी पुन्हा जिल्हा बँकेच्या निवडणुकीच्या मैदानात उतरण्याचा निर्णय घेतला आहे. आजच्या शक्तिप्रदर्शनातून त्यांनी आपली राजकीय ताकद दाखवून दिल्याची चर्चा अकोले तालुक्यात सुरू आहे.







## दुष्काळ सदृश परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर मंत्री नितेश राणे यांचा विदर्भ दौरा

**वाशिम (समर्थ गांवकरी)**

महाराष्ट्रामध्ये निर्माण झालेल्या दुष्काळसदृश परिस्थितीत जलाशय आणि तलावातील पाणीसाठा कमी असल्यामुळे मत्स्य व्यवसायापुढे संकट निर्माण झाले आहे. मत्स्य व्यवसायाला शेतीचा दर्जा असून त्यानुसार प्रत्येक नुकसानाची नोंद घेऊन मच्छीमारी करणाऱ्या सर्व बांधवांना अधिकाधिक मदत मिळवून देण्यात येईल, असे वक्तव्य राज्याचे मत्स्य व्यवसाय आणि बंदरे मंत्री नितेश राणे यांनी आज केले.

दुष्काळ सदृश परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर आढावा बैठक मंत्री नितेश राणे यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली. ही बैठक वाशिम जि. प. सभागृहात पार पडली. आमदार भावना गवळी, आमदार सई डहाके, आमदार श्याम खोडे, मुख्य कार्यकारी अधिकारी अर्पित चौहान, निवासी उपजिल्हाधिकारी विश्वनाथ घुगे , मत्स्य व्यवसाय आयुक्त भानुदास पालवे, प्रादेशिक उपायुक्त सु.वा.जांभुळे, सहायक आयुक्त प्रियंका झोड आदी उपस्थित होते. बैठकीवेळी मंत्री नितेश राणे यांनी सांगितले की, गेल्या वर्षीच्या तुलनेत यावर्षी मासे उत्पादनात मोठी घट होणार आहे. मच्छीविक्री करणाऱ्या व्यावसायिकांचे होणारे नुकसान लक्षात घेऊन आवश्यक ती सर्व मदत केली जाईल. जलाशयांमध्ये गाळ साचल्याने त्यांची क्षमता कमी होते. त्यामुळे जलाशयांमधील गाळ काढण्यासाठी राज्यव्यापी कार्यक्रम राबविण्यात येईल. जलाशयातील पाणी शेतीसाठी वापरता येणार आहे आणि जलाशये मोकळी झाल्यामुळे भविष्यात साठवण क्षमता वाढणार आहे. संबंधित यंत्रणांनी यासंबंधीचे प्रस्ताव दोन आठवड्यात शासनाकडे परिपूर्ण करून पाठवावेत असे निर्देशही त्यांनी दिले.

## उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंकडून कॅप्टन स्मित यांचे कौतुक

**मुंबई (समर्थ गांवकरी)**

दुबईहून इस्त्राईलकडे जाणाऱ्या 'फ्लाय दुबई' कंपनीच्या विमानामध्ये सह वैमानिकाने कॅप्टन स्मित मच्छार यांच्यावर प्राणघातक हल्ल्याची ३० सप्टेंबरला घटना घडली. चाकु हल्ल्यामध्ये स्मित रक्तरंजित झाले होते. या हल्ल्यामध्ये त्यांनी १७४ प्रवाशांचे प्राण वाचवले. कॅप्टन मच्छार यांनी गंभीर जखमी अवस्थेतही प्रसंगावधान राखत कॉकपिटचे दार उघडले. त्यामुळे विमानातील इतरांना हल्लेखोराला रोखता आले आणि विमान सुरक्षितपणे उतरविण्यात यश आले. त्यांच्या या धाडसाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीही कौतुक केले.

प्रवाशांचा जीव सुखरूप पद्धतीने वाचवणाऱ्या स्मित मच्छार यांचे जगभरातून कौतुक केले जात आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह केंद्रातील आणि राज्यातील अनेक मंत्र्यांनी स्मित यांच्या कामगिरीचे कौतुक होत आहे. असे असताना आता उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीही कॅप्टन स्मित मच्छार यांचे कौतुक केले आहे.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे नेमकं काय म्हणाले?

मुंबईत पत्रकारांशी संवाद साधताना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले, कॅप्टन स्मित मच्छार यांनी १७४ नागरिकांचे प्राण वाचविले. ही केवळ एका वैमानिकाच्या शौर्याची घटना नाही, तर संपूर्ण देशासाठी अभिमानाचा क्षण आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सर्वप्रथम त्यांच्या शौर्याचे कौतुक केले. त्यावेळी कॅप्टन मच्छार यांनीही पंतप्रधान मोदी यांना आपला आदर्श आणि प्रेरणास्थान मानत असल्याचे सांगितले.



# जामखेड पोलिसांनी चुकीचा गुन्हा दाखल केल्याचा आरोप

## ५ महिन्यांच्या बाळासह पीडित महिला व ग्रामस्थांनी रोखला जामखेड-करमाळा महामार्ग

जामखेड (समर्थ गांवकरी)

नान्नज (ता. जामखेड) येथील मनीषा श्रीमंत गोरे यांच्या घरात घडलेल्या १४ लाख ६३ हजार रुपयांच्या दरोडा प्रकरणाचा पोलिसांनी योग्य तपास न करता चुकीच्या कलमांन्वये गुन्हा नोंदविल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. पोलिसांच्या या मनमानी व निष्काळजी कारभाराच्या निषेधार्थ शनिवारी (दि. ३ ऑक्टोबर) सकाळी ९ वाजेच्या सुमारास फीर्यादी व आईने आपल्या ५ महिन्यांच्या दोन चिमुकल्या बाळासह संपूर्ण कुटुंब आणि ग्रामस्थांच्या साथीने जामखेड–करमाळा राज्यमार्गावर नान्नज येथे तब्बल तीन तास तीव्र रास्ता रोको आंदोलन छेडले. अखेर पोलीस प्रशासनाने लेखी आश्वासन दिल्यानंतर हे आंदोलन मागे घेण्यात आले.

मिळालेल्या सविस्तर माहितीनुसार, शुक्रवारी (दि. २ ऑक्टोबर) रात्री दोन वाजेच्या सुमारास नान्नज येथील मनीषा गोरे यांच्या घरात अज्ञात चोरट्यांनी जबरी चोरी करत सोन्या–चांदीचे दागिने व रोकड असा एकूण १४ लाख ६३ हजार रुपयांचा मुद्देमाल लंपास केला होता. या घटनेनंतर फिर्यादी मनीषा गोरे तक्रार नोंदवण्यासाठी जामखेड पोलीस ठाण्यात गेल्या असता, तेथील पोलीस निरीक्षक दशरथ चौधरी आणि सहाय्यक पोलीस निरीक्षक वर्षा जाधव यांनी योग्य सहकार्य केले नाही. उलटपक्षी, पीडित महिलेला मानसिक त्रास देत, घाईगडबडीत चुकीच्या कलमांनुसार ऑनलाईन एफआयआर नोंदवून तिच्या सह्या घेतल्याचा गंभीर आरोप गोरे कुटुंब आणि ग्रामस्थांनी केला आहे.



या अन्यायाविरोधात आक्रमक झालेल्या पीडित महिला, ५ महिन्यांच्या दोन्ही जुळी बाळे, गोरे कुटुंब आणि नान्नजच्या ग्रामस्थांनी शनिवारी सकाळी नऊ वाजता जामखेड–करमाळा रस्त्यावर गोरे यांच्या घरासमोर एकत्र येत रस्त्यावरच ठिय्या मांडला. आंदोलनप्रसंगी बोलताना फिर्यादी मनीषा गोरे यांनी सांगितले की, प्रत्यक्ष घटनेच्या वेळी एकूण सहा दरोडेखोर उपस्थित होते, असे स्पष्ट सांगूनही पोलिसांनी दबावाखाली गुन्ह्यात केवळ चारच आरोपी दाखवले. एवढेच नव्हे तर तुमचे सोने कमी गेले आहे, तुम्ही जास्त का सांगता?, तुमच्याकडे एवढे सोने आले कुठून? असे प्रश्न विचारून पोलिसांनी आपल्याला वेठीस धरल्याचे आणि मानसिक त्रास दिल्याचे त्यांनी रास्तारोको आंदोलना दरम्यान सांगितले.

यावेळी नान्नजचे माजी सरपंच संतोष पवार यांनी पोलीस प्रशासनाच्या कारभारावर जोरदार हल्लाबोल केला. घडलेली घटना अत्यंत गंभीर स्वरूपाची असतानाही दरोड्याचे योग्य कलम लावले गेले नाही. पीडित महिलेवर पोलीस ठाण्यात दबाव आणून चुकीची माहिती नोंदवण्यास भाग पाडले गेले. घटनेच्या दिवशी दुपारी चार ते सहा वाजेपर्यंत पोलीस ठाण्यात एकही वरिष्ठ अधिकारी उपस्थित नव्हता. यावरून पोलिसांना या दरोड्याचे गांभीर्य नसल्याचे दिसून येते, ज्यामुळे या गुन्ह्यात पोलिसांचे तर साटेलोटे नाही ना? असा सवालही संतोष पवार यांनी आंदोलनादरम्यान उपस्थित केला. तीन तास चाललेल्या या मार्गावरील वाहतूक पूर्णपणे ठप्प झाली होती. घटनेची माहिती मिळताच पोलीस दल घटनास्थळी दाखल झाले. सहाय्यक पोलीस निरीक्षक अजित मोरे यांनी आंदोलकांशी आणि पत्रकारांशी संवाद साधताना सांगितले की, फिर्यादी आणि ग्रामस्थांच्या मागण्यांबाबत वरिष्ठ अधिकाऱ्यांशी सविस्तर चर्चा करण्यात आली आहे. पोलिसांच्या वतीने आंदोलकांना लेखी आश्वासन देण्यात आले असून, सदर गुन्ह्याचा तपास मी स्वतः करत आहे. सर्व आरोपींचा लवकरात लवकर शोध घेऊन त्यांच्यावर कठोरात कठोर कारवाई केली जाईल, असे त्यांनी स्पष्ट केले. पोलिसांच्या या लेखी आश्वासनानंतर ग्रामस्थांनी रास्ता रोको आंदोलन मागे घेतले. या आंदोलनाला नान्नज व्यापारी असोसिएशन व नान्नज ग्रामस्थ यांनी गोरे कुटुंबला पाठींबा दिला.

# पर्यावरण संवर्धनासाठी संस्कार आणि अध्यात्माची जोड आवश्यक : प्रा. दीपक राऊत

**जागतिक प्राणी दिन सप्ताहानिमित्त राजूर वनविभागाचा उपक्रम; विद्यार्थ्यांना पर्यावरण संवर्धनाची प्रेरणा**

राजूर (समर्थ गांवकरी)

पर्यावरण संवर्धनासाठी वृक्षारोपणाबरोबरच संस्कार, संतविचार आणि सर्व जीवांविषयी भूतदया आचरणात आणणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन साई–दीप एज्युकेशन, कोतुळचे संचालक प्रा. दीपक राऊत यांनी केले. वनपरिक्षेत्र अधिकारी डी. डी. पडवळे यांच्या मार्गदर्शनाखाली राजूर वनविभागाच्या वतीने एकलव्य मॉडेल रेसिडेन्सियल स्कूल व पीआरटीसी, मवेशी येथे जागतिक प्राणी दिन सप्ताहानिमित्त या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

'पर्यावरण संवर्धन : काळाची गरज, संस्कारांची जबाबदारी आणि अध्यात्माची दिशा' या विषयावर बोलताना त्यांनी संत तुकाराम महाराजांचे वृक्षवल्ली आम्हा सोयरे, वनचरे आणि संत ज्ञानेश्वर माऊलींच्या




पसायदानातील भूता परस्परे पडो, मैत्र जीवांचे या विचारांसह संतपरंपरा, आदिवासी बांधवांचे निसर्गाशी नाते आणि जादव पायेंग यांच्या जंगलाचे उदाहरण दिले. 'पक पक पकाक' चित्रपटातील भुत्या–चिखलूंचा संदर्भ देत प्रत्यक्ष जीवनात भूतदया व पर्यावरण रक्षणाची भूमिका साकारण्याचे आवाहन केले. विद्यार्थ्यांनी टाळ्यांच्या कडकडाटात प्रतिसाद दिला.

यंदा लावलेल्या झाडांचा पुढील वर्षी वाढदिवस साजरा करण्याचे आवाहन करत त्यांनी झाड लावणे ही सुरुवात; ते जगवणे ही खरी जबाबदारी, असा संदेश दिला. यावेळी वृक्षारोपण करण्यात आले तसेच पर्यावरणप्रेमी राहुल राऊत यांचा वाढदिवस वृक्ष भेट देऊन साजरा करण्यात आला.

कार्यक्रमास एकलव्य मॉडेल रेसिडेन्सियल स्कूलचे प्राचार्य देवानंद थुल, पीआरटीसीचे बांबळे सर, वनविभागाचे अधिकारी–कर्मचारी, शिक्षकवृंद व विद्यार्थी उपस्थित होते. राहुल राऊत यांनी पाहुण्यांची ओळख करून दिली. आभार वनपाल आर. एन. घोडसरे यांनी मानले.

# अहिल्यानगर जिल्हा बँक निवडणुकीतून राम शिंदेंची माघार

अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)

अहिल्यानगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीत उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या अंतिम दिवशी मोठी राजकीय घडामोड घडली आहे. विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांनी जिल्हा बँकेच्या निवडणुकीतून माघार घेण्याचा निर्णय जाहीर केला आहे.



कर्जत–जामखेडसह जिल्ह्यातील प्रमुख कार्यकर्ते आणि समर्थकांशी सखोल चर्चा केल्यानंतर राम शिंदे यांनी हा निर्णय घेतल्याची माहिती आहे. त्यांच्या माघारीमुळे जिल्हा बँकेच्या निवडणुकीतील राजकीय समीकरणांवर परिणाम होण्याची शक्यता आहे.

दरम्यान, सोमवारी उमेदवारी अर्ज दाखल करण्याची मुदत संपल्यानंतर मंगळवारी (दि. ६) अर्जांची छाननी होणार आहे.

त्यानंतर बुधवारपासून वैध उमेदवारी अर्जांची यादी प्रसिद्ध केली जाणार आहे. २२ ऑक्टोबरपर्यंत उमेदवारी अर्ज मागे घेता येणार असून, त्यानंतर निवडणुकीचे अंतिम चित्र स्पष्ट होईल. बिनविरोध न झालेल्या जागांसाठी २ नोव्हेंबर रोजी मतदान होणार आहे. त्यामुळे राम शिंदे यांच्या माघारीनंतर आता जिल्हा बँकेच्या निवडणुकीत पुढील राजकीय हालचालींकडे जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

# जिल्हा बँकेसाठी सभापती काकासाहेब तापकीर यांचा उमेदवारी अर्ज दाखल

**कर्जत तालुका सोसायटी मतदारसंघातून अर्ज केला दाखल**

कर्जत (समर्थ गांवकरी)

सहकार क्षेत्रात आशिया खंडातील सर्वात मोठी असलेल्या अहिल्यानगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संचालक मंडळ पंचवार्षिक निवडणूक सन. २०२६ ते २०३१ करिता कर्जत तालुका सोसायटी मतदारसंघातून कर्जत तालुका कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती काकासाहेब तापकीर यांनी उमेदवारी अर्ज सोमवारी, दि.५ रोजी दाखल केला आहे.

यावेळी बाजार समितीचे संचालक वसंत कांबळे, महेश काळे, अण्णासाहेब महारनवर, थेरगावचे माजी सरपंच मिनीनाथ शिंदे, चंद्रकांत महारनवर




यांच्यासह आदी उपस्थित होते.

बहुचर्चित अहिल्यानगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीत सभापती तापकीर यांनी उमेदवारी अर्ज भरल्याने तालुक्यातील राजकीय वर्तुळात चर्चेला उधाण आले आहे.

# रणबीर कपूरच्या 'रामायण' चित्रपटाच्या सेटवर आग, सुदैवाने जीवितहानी नाही...

मुंबई (समर्थ गांवकरी)

बॉलिवूड अभिनेता रणबीर कपूरच्या 'रामायणा' चित्रपटाच्या सेटला आग लागल्याची घटना घडली आहे. आज (०५ ऑक्टोबर– सोमवार) दुपारी चित्रपटाच्या सेटला भीषण आग लागली होती. घटनेमध्ये सुदैवाने कोणतीही जीवितहानी झालेली नाही. मुंबईतील गोरेगाव फिल्म सिटीमध्ये ही आगीची घटना घडली आहे. आगीमुळे हवेत धुराचे लोट पसरले, ज्यामुळे फिल्म सिटीमध्ये घबराट पसरली होती. 'रामायणा' चित्रपटाचे चित्रीकरण आजसाठी थांबवण्यात आल्याची माहिती आहे. जरीही जीवितहानी झाली नसली तरीही सेटचे मात्र मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. प्राथमिक माहितीनुसार, 'रामायणा' चित्रपटाच्या सेटवर शॉर्टसर्किटमुळे आग लागल्याची माहिती मिळाली आहे.



# ज्ञानसंपदा शाळेत स्वच्छता अभियानातून 'स्वच्छतेचा संस्कार'

अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)

ज्ञानसंपदा शाळेच्या रौप्य महोत्सवी वर्ष २०२६–२७ निमित्त तसेच राष्ट्रपिता महात्मा गांधी जयंतीचे औचित्य साधून शाळेतील इयत्ता ५ वी व ६ वीच्या विद्यार्थ्यांसाठी स्वच्छता अभियान राबविण्यात आले. सकाळी ८.४५ वाजता आयोजित या उपक्रमात एकूण १७९ विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांचे छोटे–छोटे गट तयार करून त्यांना परिसरनिहाय स्वच्छतेची जबाबदारी देण्यात आली. रामकृष्ण मठ परिसर, शिवमंदिर परिसर व मूकबधिर विद्यालय परिसर तसेच शाळेचा परिसर या ठिकाणी विद्यार्थ्यांनी स्वच्छता केली. विद्यार्थ्यांनी हातमोजे व कचरा संकलनाच्या पिशव्यांचा वापर करून परिसरातील कचरा गोळा केला.यावेळी ओला व सुका कचरा वेगळा करण्याचे महत्त्व, कचऱ्याचे योग्य संकलन व स्वच्छ परिसराचे महत्त्व याबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. संकलित कचऱ्याची योग्य विल्हेवाट लावण्यासाठी महापालिकेशी संवाद साधण्यात आला.स्वच्छता ही केवळ एक दिवसाची मोहीम नसून ती प्रत्येकाच्या जीवनशैलीचा भाग झाली पाहिजे, असा संदेश या उपक्रमातून विद्यार्थ्यांना देण्यात आला. विद्यार्थ्यांमध्ये स्वच्छतेची सवय, सामाजिक जबाबदारी आणि पर्यावरणाविषयी जागरूकता निर्माण करण्याच्या दृष्टीने हा उपक्रम उपयुक्त ठरला.



# विहिंपच्या मंदिर, अर्चक, पुरोहित आयामाच्या वतीने १० ऑक्टोबरला सामुदायिक श्राद्ध, तर्पण विधी पूजनाची व्यवस्था

अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)

भाद्रपद महिन्यातील संपूर्ण वद्य पक्ष हा पूर्वजांसाठी समर्पित असतो. या पक्षात पितरांचे स्मरण करून त्यांचे पूजन केले जाते. सर्व पित्री अमावस्येच्या दिवशी पूर्वजांचे ऋण फेडण्यासाठी त्यांच्या नावाने श्राद्ध विधी करणे आवश्यक असते.

या पार्श्वभूमीवर सर्व हिंदू समाज बांधवांसाठी विश्व हिंदू परिषद प्रणित मंदिर,अर्चक,पुरोहित आयामाच्या वतीने लालटाकी रोडवरील खाकीदास बाबा मठ येथे शनिवार दि. १० ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी ८ ते १० या वेळेत सामुदायिक श्राद्ध, तर्पण (पितरांचे पूजन) चे आयोजन करण्यात आले आहे. पूजेसाठी सोबत काय आणावे : तांब्या, ताम्हण, पळी, फुलपात्र, तुळशीची पाने, पूर्वजांचा फोटो, बसकर, नॅपकीन. पूजेसाठी लागणारे इतर सर्व साहित्य विहिंपच्या मंदिर, अर्चक, पुरोहित आयामा तर्फे मोफत दिले जाणार आहे. हिंदू बांधवांनी या पवित्र कार्यात मोठ्या संख्येने सहभागी होऊन पुण्य लाभ घ्यावा, असे आवाहन विश्व हिंदू परिषदेचे जिल्हा मंत्री अनिल जोशी,मंदिर,अर्चक, पुरोहित,आयामाचे विभाग प्रमुख गजेंद्र सोनवणे, जिल्हा संपर्कप्रमुख श्रीकांत नांदापूरकर व जिल्हा



सह–प्रमुख हरीभाऊ डोळसे, जिल्हा प्रसिद्धी प्रमुख अमोल भांबरकर यांनी केले आहे.

**अधिक माहिती व नाव नोंदणीसाठी संपर्क :- हरिभाऊ डोळसे (माळीवाडा)- मो.९८२२२७१८०७ - गजेंद्र सोनवणे (नालेगाव) - मो.९४२२७२७७२६ - मुकुल गंधे (सावेडी उपनगर) -मो.९८९०३३६७७७ - ॲड. सचिन पाठक गुरुजी (सावेडी)-मो. ९५११११११६२,श्रीकांत नांदापूरकर (पाईपलाईन रोड) - ७०२०७५४७६१,अमोल भांबरकर (कल्याण रोड)- मो. ७९७२००१९३४,अरुण खिची (केडगाव) -मो.७२६३९००००६, मिलिंद मोभारकर (बालिकाश्रम रोड)-मो. ९९२३००२४४७ यांच्याशी संपर्क साधावा.**

# अभिजात मराठी भाषा समृद्धीसाठी शब्दगंधची चळवळ महत्त्वाची : बापूसाहेब भोसले

**अभिजात मराठी भाषा गौरव दिनाचे औचित्य साधून 'मागे वळून पाहताना' लेखसंग्रहाचे प्रकाशन**

अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)

शब्दगंध साहित्यिक परिषदेची चळवळ ग्रामीण भागापर्यंत झपाट्याने पोहोचली असून कथाकथन, काव्यसंमेलन, पुस्तक प्रकाशन, साहित्य संमेलन आदी विविध साहित्यिक उपक्रम सातत्याने राबवून शब्दगंधने साहित्य क्षेत्रात आपला वेगळा ठसा उमटविला आहे.

मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळावा, यासाठी शब्दगंधने साहित्य संमेलनांच्या विचारपीठावरून सातत्याने भूमिका मांडली. आता मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाला असून, भविष्यात मराठी भाषा अधिक समृद्ध करण्यासाठी शब्दगंधची चळवळ निश्चितच उपयुक्त ठरेल, असे प्रतिपादन शेवगाव पंचायत समितीचे माजी सभापती, ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते,कृषितज्ज्ञ बापूसाहेब भोसले यांनी केले.

अभिजात मराठी भाषा गौरव दिनाचे औचित्य साधून शब्दगंध साहित्यिक परिषद, महाराष्ट्र राज्य च्या वतीने शर्मिला गोसावी संपादित 'मागे वळून पाहताना' या लेखसंग्रहाचे प्रकाशन नुकतेच जाधव लॉन्स येथे बापूसाहेब भोसले यांच्या अध्यक्षतेखाली झाले. यावेळी शहर सहकारी बँकेचे माजी चेअरमन सुरेश



चव्हाण, ज्येष्ठ साहित्यिक प्रा. मेधाताई काळे, शब्दगंधचे अध्यक्ष राजेंद्र उदागे, संस्थापक सुनील गोसावी, सुभाष सोनवणे, रेखाचित्रकार सतीश कुलकर्णी, मसाप चे अध्यक्ष ज्ञानदेव पांडुळे आदी मान्यवर उपस्थित होते.यावेळी बोलताना बापूसाहेब भोसले म्हणाले, शालेय जीवनापासूनच साहित्यिक, कलावंत आणि लेखकांशी माझा संबंध आला. बागायतदार म्हणून काम करत असतानाही गोरगरीब व कष्टकरी समाजासाठी कार्य करण्याचा प्रयत्न केला. या कार्यात कधी फायदा झाला, तर कधी तोटाही सहन करावा लागला; मात्र त्याचा विचार कधी केला नाही. शब्दगंध च्या स्थापनेपासून आम्ही या चळवळीबरोबर आहोत आणि यापुढेही शेवटपर्यंत हे नाते कायम राहील.

प्रा.मेधाताई काळे म्हणाल्या की, शब्दगंधचे विचारपीठ नवोदित साहित्यिकांना संधी देत असून त्याचबरोबर ज्येष्ठ साहित्यिकांचाही योग्य सन्मान राखत आहे. 'मागे वळून पाहताना' हा लेखसंग्रह नव्या पिढीसाठी निश्चितच प्रेरणादायी ठरेल.लेखसंग्रहाच्या संपादक शर्मिला गोसावी यांनी प्रास्ताविकातून संग्रहामागील भूमिका स्पष्ट केली.प्रत्येकाच्या आयुष्यात अनेक घटना, अनुभव आणि व्यक्तींचा प्रभाव असतो. हे अनुभव इतरांपर्यंत पोहोचवण्याची इच्छा असली तरी अनेकदा ते मनातच राहून जातात. 'मागे वळून पाहताना' या लेखसंग्रहाच्या माध्यमातून लेखकांना आपल्या आयुष्यातील चढ–उतार, प्रेरणादायी व्यक्तिमत्त्वे, साहित्यिक प्रवास आणि जीवनानुभव शब्दबद्ध करण्याची संधी मिळाली आहे. नव्या–जुन्या सर्व साहित्यिकांचा शब्दगंधला अभिमान असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी सुभाष सोनवणे, संतोष कानडे, ज्ञानदेव पांडुळे, विठ्ठल सोनवणे आणि स्नेहा पंजाबी यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमास जालिंदर बोरुडे, स्वाती अहिरे, क्रांती करंजगीकर, वॉरियर्स फाउंडेशनच्या सचिव संगीता गिरी यांच्यासह अनेक साहित्यिक व मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ.अनिल गर्जे यांनी केले, तर प्रा.डॉ.तुकाराम गोंदकर यांनी आभार मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी बबनराव गिरी, मकरंद घोडके,शामा मंडलिक, संदीप गोसावी, हर्षली गिरी, दिशा व अनुष्का गोसावी यांनी विशेष परिश्रम घेतले.

'मागे वळून पाहताना' या लेखसंग्रहामध्ये प्राचार्य डॉ. जी.पी.ढाकणे,सौ.जयश्री देशमुख, विठ्ठल सोनवणे, अजयकुमार पवार, स्वाती गोसावी, सौ.उर्मिला शिंदे, रामदास कोतकर, सौ.एस. एम. मिर्झा, सुरेखा घोलप, श्रीमती वर्षा भोईटे, सौ उज्वला धस, डॉ.अशोक ढगे, जगन्नाथ गोसावी यांच्यासह एकूण २४ व्यक्तींच्या जीवनानुभवांवर आधारित लेखांचा समावेश करण्यात आला आहे. जीवनातील संघर्ष, अनुभव, प्रेरणादायी व्यक्ती आणि साहित्यिक वाटचालीचे विविध पैलू या संग्रहातून वाचकांसमोर आले आहेत.यावेळी सुरेखा कानडे, सौ एम आर जाधव, अविनाश देशमुख, कल्पना तुपे, उमादेवी राऊत,सौ.फरहिम शेख,सोमनाथ लोखंडे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

# दूरदृष्टी आणि तरुणांच्या हृदयातील युवा नेता

# मा. श्री. अमितजी भांगरे यांना वाढदिवसानिमित्त शुभेच्छा...!

(समर्थ गांवकरी)

**अकोले तालुक्याचे राजकारण नेहमीच संघर्षमय राहिले आहे. गेली अनेक दशके भांगरे विरुद्ध पिचड हे दोन परिवार एकमेकांविरोधात उभे राहत आले आहेत. या राजकीय पार्श्वभूम ीवर, आजच्या पिढीत भांगरे परिवाराच्या चौथ्या पिढीचे प्रतिनिधित्व करणारे युवक नेते अमित भांगरे यांनी स्वत:च्या कार्यशैलीतून एक वेगळी ओळख निर्माण केली आहे.**



### भांगरे परिवाराची ऐतिहासिक भूमिका

भांगरे परिवाराचे अकोले तालुक्यातील राजकारण आणि समाजकारणात मोलाचे योगदान आहे. स्व. अशोकराव भांगरे यांनी तालुक्यातील विकासकामांना नवीन दिशा दिली. ग्रामविकास, शिक्षण आणि समाजसेवेच्या माध्यमातून त्यांनी अनेक उपक्रम राबवले. त्यांच्या निधनानंतर, त्यांच्या स्वप्नांचा वारसा अमित भांगरे यांनी पुढे नेला आहे.

### युवक नेते अमित भांगरे - बदलाचे वाहक

अमित भांगरे यांनी अल्पवधीतच आपल्या... नेतृत्वगुणांनी जनतेचा विश्वास जिंकला आहे. त्यांनी गावागावात, वाड्यावस्त्यांवर थेट संपर्क साधत लोकांच्या अडचणी समजून घेतल्या आणि त्यांच्या सोडवणुकीसाठी प्रयत्न केले. त्यांच्या कार्यात विकासाबरोबरच समाजातील सर्व घटकांना सहभागी करून घेण्याची वृत्ती दिसते.

ते तरुणांसाठी रोजगाराच्या संधी, शेतकऱ्यांसाठी २४ तास वीज व पाण्याची उपलब्धता, तसेच रस्ते आणि शिक्षणाच्या सुविधा वाढवण्याच्या व्हिजनसह काम करत आहेत. त्यांनी मुळा–प्रवरा, आढळा आणि पठार भागासाठी विकासाचे नवे मॉडेल सादर केले आहे.

### डॉ. विश्वासराव आरोटे यांची भावना

**अमित भांगरे यांच्या वाढदिवसानिमित्त डॉ. विश्वासराव आरोटे यांनी सांगितले की, अमित भांगरे हे केवळ एक राजकीय व्यक्तिमत्त्व नाहीत, तर एक समाजविकासाचे प्रेरणास्थान आहेत. त्यांचा विचार, काम करण्याची ऊर्जा आणि समाजाशी असलेली नाळ ही त्यांच्या कार्याचा खरा पाया आहे. त्यांच्या नेतृत्वामुळे अकोले तालुक्यात सकारात्मक बदल घडत आहेत.**

### सुनीता भांगरे यांचे योगदान

अमित भांगरे यांच्या मातोश्री सुनीता भांगरे यांनीही समाजकारणात सक्रिय सहभाग घेतला आहे. बचत गटांच्या माध्यमातून महिलांना स्वावलंबी बनवण्याचे कार्य त्यांनी केले असून, त्यांच्या प्रयत्नांमुळे घराघरांपर्यंत संपर्क आणि विश्वास निर्माण झाला आहे.

### समाजहितासाठी सातत्यपूर्ण प्रयत्न

अमित भांगरे यांचे कार्य फक्त राजकीय क्षेत्रापुरते मर्यादित नाही. त्यांनी शिक्षण, आरोग्य आणि पर्यावरण संवर्धन क्षेत्रातही उल्लेखनीय काम केले आहे. विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक मदत, आदिवासी भागात आरोग्य शिबिरे, तसेच पाणी संवर्धनाचे उपक्रम यामुळे ते सर्वसामान्यांच्या मनात आदराचे स्थान निर्माण करत आहेत.

अशा या दूरदर्शी आणि तरुण नेत्याला वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा!

**अमित भांगरे यांच्या नेतृत्वाखाली अकोले तालुका विकासाच्या नव्या पर्वात प्रवेश करेल, असा जनतेचा विश्वास आहे.**







## थोडक्यात पण महत्त्वाचे

### सरसकट पंचनामे करा : सुशांत आरोटे



गणोरे (समर्थ गांवकरी)

महाराष्ट्रात ट्रिगर १ लागू करून अनेक तालुके दुष्काळ ग्रस्त जाहीर करण्यात आले असून त्यात अहिल्यानगर जिल्ह्यातील अकोले तालुका देखील समावेश आहे. अकोले तालुक्यात देखील दुष्काळ जाहीर करण्यात आला असून पंचनामे चालू आहे.,परंतु पंचनामे हे सरसकट करावेत अशी मागणी शेतकरी आणि स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या वतीने करण्यात आली आहे. अकोले तालुक्यातील शेतकऱ्यांचे शेतीचे सरसगट म्हणजे सरसगट पंचनामे करून घ्यावेत आणि शेतकऱ्यांना कोणतेही निकष न लावता तातडीने मदत द्यावी. दुष्काळाला शेतकऱ्यांना तोंड देता देता त्यांच्या पशुधनाला देखील दुष्काळाला सामोरे जावे लागत असल्याने चारा छावणीला न देता चारा दावणीला द्यावा. विद्यार्थ्यांना परीक्षा फी माफ करत असताना त्यांची महाविद्यालयीन फी देखील माफ करावी., शेतकऱ्यांना निकष न लावता पीक विमा देखील तातडीने शेतकऱ्यांना द्यावेत. अशा विविध मागण्या अकोल्याचे आमदार डॉ किरण लहामटे यांना निवेदन देऊन सरकारी पातळीवर हे मुद्दे मांडून प्रशासनाला आदेश देऊन शेतकऱ्यांना तातडीनं मदत द्यावी असे निवेदन अकोले तालुका स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या वतीने तालुकाध्यक्ष सुशांत आरोटे यांनी दिले आहे. यावेळी स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे उपाध्यक्ष सुनील पुंडे,कार्याध्यक्ष संतोष उगले,संघटक सोमनाथ आहेर, युवक अध्यक्ष शुभम आंबरे, भाजप गटनेते जालिंदर वाकचौरे आण्णासाहेब आहेर, विजय आहेर, नवनाथ पवार, अक्षय गाडेकर, सचिन रेवगडे आदी उपस्थित होते.

### ‘महा–उपलब्धी’ ॲपबाबत निवृत्तीवेतनधारकांसाठी कार्यशाळा

अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)

जिल्हा कोषागार कार्यालय, अहिल्यानगरच्या अधिनस्त सर्व निवृत्तीवेतनधारक व कुटुंब निवृत्तीवेतनधारकांसाठी शासनाच्या ‘महा–उपलब्धी’ (Maha-UPLBDHI) मोबाईल ॲपबाबत जनजागृती करण्यासाठी मंगळवार, दि. ६ ऑक्टोबर रोजी सकाळी ११ वाजता जिल्हा कोषागार कार्यालय, अहिल्यानगर येथे कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. वित्त विभागाच्या शासन निर्णय अन्वये निवृत्तीवेतनधारक व कुटुंब निवृत्तीवेतनधारकांसाठी दि. १ जुलै २०२६ पासून ‘महा– उपलब्धी’ हे मोबाईल ॲप कार्यान्वित करण्यात आले आहे. या ॲपच्या माध्यमातून निवृत्तीवेतनाशी संबंधित विविध सेवा जलद, सुलभ आणि पारदर्शक पद्धतीने उपलब्ध करून देण्यात येत आहेत. या ॲपचा वापर, उपलब्ध सेवा तसेच निवृत्तीवेतनधारकांना त्याचा होणारा उपयोग याबाबत माहिती देण्यासाठी कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. प्रधान सचिव (लेखा व कोषागारे), वित्त विभाग यांच्या मार्गदर्शनाखाली ही कार्यशाळा आयोजित करण्यात येत आहे. जिल्ह्यातील निवृत्तीवेतनधारक, कुटुंब निवृत्तीवेतनधारक तसेच पेन्शनर्स संघटनांच्या प्रतिनिधींनी या कार्यशाळेस जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहून ‘महा–उपलब्धी’ ॲपची माहिती करून घ्यावी, असे आवाहन अपर कोषागार अधिकारी (निवृत्तीवेतन), अहिल्यानगर तुकाराम भाबड आणि जिल्हा कोषागार अधिकारी, अहिल्यानगर जनार्दन सहारे यांनी केले आहे.

## आदिवासी समाजाच्या विकासासाठी शासकीय योजनांचा लाभ प्राधान्याने द्यावा : डॉ. किरण लहामटे

शिर्डी (समर्थ गांवकरी)

शासकीय योजनांचा लाभ पात्र लाभार्थ्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी प्रशासनाने अधिक गतिमान आणि लोकाभिमुख होण्याची गरज आहे. नागरिकांना शासकीय सेवांसाठी वारंवार शासकीय कार्यालयांमध्ये यावे लागू नये. यासाठी सर्व शासकीय योजना लाभ प्राधान्याने व लोकाभिमुख होऊन एकाच ठिकाणी उपलब्ध करून द्यावा, असे आवाहन अकोले मतदार संघाचे आमदार

डॉ. किरण लहामटे यांनी केले. सेवा संकल्प अभियाना अंतर्गत एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय राजूर, व राणी दुर्गावती जयंती निमित्त आदिवासी महिला बचत गट म ेळावा व शासकीय सेवा शिबिर राजूर येथील अक्षय साई लॉन्स येथे आयोजित करण्यात आले होते.

यावेळी .प्रकल्प अधिकारी राजूर येथील देवकन्या बोकडे श्री अकोले तहसीलदार सिद्धांत मोरे, गटविकास अधिकारी अमर माने , महिला व बालविकास अधिकारी केदार नांगरे ,वनपरिक्षेत्र अधिकारी दत्तात्रय पडवळ प्रतिभा सोनवणे, कृषी अधिकारी, श्री. अतुल पवार . मनोज पैठणकर, श्री. तुषार पवार, श्री. योगेश ढोणे, श्री. दीपक कालेकर, श्री. संजय सुसलादे

लेखा अधिकारी व प्रकल्प कार्यालयातील कर्मचारी वृंद उपस्थित होते. आदिवासी नागरिकांच्या अडचणी समजून घेऊन त्यावर संबंधित विभागांनी तात्काळ कार्यवाही करावी. प्रशासन व नागरिकांमधील संवाद वाढल्यास अनेक प्रश्न जागेवरच मार्गी लागू शकतात. पात्र लाभार्थी शासकीय योजनांपासून वंचित राहणार नाहीत, यासाठी सर्व विभागांनी समन्वयाने काम करावे, असे आवाहन आमदार लहामटे यांनी केले.

राज्य शासनामार्फत दि. १७ सप्टेंबर ते दि. १७ ऑक्टोबर या कालावधीत सेवा संकल्प अभियान २०२६ राबविण्यात येत आहे. शासनाच्या योजनाचा प्रत्यक्ष लाभ सामान्य नागरिकांपर्यंत पोहोचावा, तसेच नागरिकांच्या अडचणींचे स्थानिक पातळीवर निराकरण व्हावे, या उद्देशाने या शिबिराचे आयोजन करण्यात आले.

**सेवा संकल्प अभियान अंतर्गत राणी दुर्गावती जयंती निमित्त राजूर येथे आदिवासी महिला बचत गट मेळावा व शासकीय सेवा शिबिर संपन्न**



आदिवासी मेळावा व शासकीय सेवा शिबिरात सेवा संकल्प अभियान २०२६ अंतर्गत अनुसूचित जमाती व इतर पारंपरिक वनहक्क अधिनियम २००६ नियम २००८ व सुधारित नियम २०१२ च्या प्रभावी अंमलबजावणी अंतर्गत ७ ई आणि १२ ई चे प्रमाणपत्र वाटप करण्यात आले.

## मराठीचा अभिमान बाळगा पण इतर भाषांचा द्वेष नको : प्राचार्य बाळासाहेब खिलारी

**ढोकेश्वर विद्यालयात अभिजात मराठी भाषा गौरव दिन उत्साहात साजरा मराठी भाषेची खरी ताकद तिच्या शब्द संपत्तीत, भावनेत, आणि माणसांना जोडण्याच्या समर्थ्यात आहे. म्हणून प्रत्येकाने मराठी भाषेचा अभिमान बाळगला पाहिजे पण त्याच वेळेस इतर भाषांचा द्वेष करता कामा नये असे प्रतिपादन प्राचार्य बाळासाहेब खिलारी यांनी केले.**



टाकळी ढोकेश्वर(समर्थ गांवकरी)

मराठी भाषेला ३ ऑक्टोबर २०२४ रोजी भारत सरकारने अभिजात भाषेचा दर्जा दिला. त्या निमित्ताने ढोकेश्वर विद्यालयात अभिजात मराठी भाषा गौरव दिन साजरा करण्यात आला. त्या कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी प्राचार्य बाळासाहेब खिलारी होते. प्रथम विद्यालयात ज्ञानेश्वरीची ग्रंथ दिंडी टाळ मृदूंगाच्या गजरात काढण्यात आली. नंतर वि. वा. शिरवाडकर उर्फ कुसुमाग्रज यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. कु. प्रियल झावरे, कु.आराध्या कडुस्कर, कु.समृद्धी जांभळकर यांनी मराठी भाषेचे वैभव, संस्कृती व वारसा याबद्दल भाषण केले. प्राचार्य बाळासाहेब खिलारी यांनी मराठी भाषे विषयी गीत सादर केले. पारनेर येथील बी. एड कॉलेज चे छात्र अध्यापक सुदेश मुंढे यांनी बासरी वादन व गितगायन सादर केले. तन्वी गोरडे व वैष्णवी चव्हाण यांनी मराठी भाषेविषयी गीत सादर केले. रोनित कटारिया याने संत ज्ञानेश्वर व श्रीपाद मुंडे याने संत तुकाराम यांची भूमिका सादर केली. तसेच या प्रसंगी जुन्नर तालुक्यातील बेल्हे येथे छत्रपती शिवराय भेदीक शाहीरी राज्यस्तरीय मेळाव्यात शाहीरआणि आदर्श शिक्षक आण्णासाहेब चौरे गुरुजी यांना ’कै. आमदार धोंडिभाऊ पिंगट स्मृती जीवन गौरव पुरस्कार’ मिळाला त्याबद्दल विद्यालयात आण्णासाहेब चौरे गुरुजी यांचा सन्मान करण्यात आला.

## दुष्काळात पशुधन वाचवण्यासोठी शेतकऱ्यांची धडपड

संगमनेर खुर्द (समर्थ गांवकरी)

**■ पशुधन वाचवण्यासाठी चारा साठवणीचे शेतकऱ्यांचे नियोजन.**
**■ मका मुरघास ,सोयाबीन भुस्सा, वैरण इ. चाऱ्याची मोठ्या प्रमाणात साठवण**

संगमनेर तालुक्यात बहुतांश भागांमध्ये दुष्काळाची दाहकता जाणूऊ लागली आहे. ऑक्टोबर मध्येच उष्णतेने कहर केला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांची राहिलेली मका, घास,ज्वारी इ.चारा पिके करपू लागली आहे. ऐन पावसाळ्यातच पशुधनाचा चाऱ्याचा प्रश्न गंभीर बनत चालला आहे. बळीराजाला आता पिण्याच्या पाण्याचा प्रश्न बरोबरच पशुधनाच्या चाऱ्याच्या नियोजनासाठी पशुपालक शेतकऱ्यांनी चारा साठवणुकीवर भर दिला आहे.

येत्या काळात, चारा पिकांची मागणी वाढल्यामुळे, मका, ज्वारी इ . महाग होण्याची शक्यता असल्याने. शेतकऱ्यांनी आत्तापासूनच चारा साठवणूक करण्यावर भर दिला आहे .

यामुळे तालुक्याच्या ग्रामीण भागामध्ये मका मुरघास, ज्वारी, बाजरीची वैरण, सोयाबीनचा भुसा इ. चाऱ्याची साठवणूक करून आपले पशुधन वाचवण्यासाठी बळीराजा धडपड करत आहे.





## सिन्नरमधून धनगर ST आरक्षण लढ्याला बळ

### निवृत्ती मुरडणर यांची सोशल मीडिया प्रमुखपदी नियुक्ती

शिर्डी/सिन्नर (समर्थ गांवकरी)

धनगर समाजाच्या एसटी आरक्षणाच्या अंमलबजावणीसाठी सुरू असलेल्या राज्यव्यापी लढ्याला सिन्नरमधूनही भक्कम पाठिंबा मिळाला आहे.

शिर्डी येथील साई निवारा येथे गेल्या तीन दिवसांपासून सुरू असलेल्या पदाधिकारी व कार्यकर्ता मेळाव्याचा आज २ ऑक्टोबर रोजी गांधी जयंतीनिमित्त समारोप करण्यात आला.

या मेळाव्यात छावा भारत क्रांती मि शनचे सिन्नर समन्वयक तथा पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर मिशनचे प्रमुख निवृत्ती मुरडणर यांनी मल्हार योद्धा दीपक भाऊ बोराडे यांना घोंगडी व काठी देऊन धनगर समाजाच्या एसटी आरक्षण अंमलबजावणीसाठी सुरू असलेल्या राज्यव्यापी चळवळीला पाठिंबा दर्शविला.

निवृत्ती मुरडणर यांच्यावर मोठी जबाबदारी

दरम्यान, निवृत्ती मुरडणर यांची अहिल्याबाई होळकर एसटी आरक्षण अंम लबजावणी अभियानाच्या सोशल मीडिया समन्वय प्रमुख म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. राज्याचे प्रमुख दीपक बोराडे यांच्या हस्ते त्यांना नियुक्तीपत्र देऊन सत्कार करण्यात आला.

यापूर्वी निवृत्ती मुरडणर यांनी राज्यपाल हरिभाऊ बागडे यांची भेट घेतली होती. या भेटीप्रसंगी परमेश्वर नलावडे आणि शशिकांत ठोक उपस्थित होते.







रथयात्रेतून एल्गार

मेळाव्याला मार्गदर्शन करताना दीपक बोराडे यांनी राज्यातील प्रमुख पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांना संघटनात्मक कामाबाबत विशेष सूचना दिल्या. तसेच लवकरच राज्यव्यापी पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर रथयात्रेच्या माध्यमातून एसटी आरक्षणाच्या अंमलबजावणीसाठी एल्गार करण्यात येणार असल्याचे जाहीर केले. या मेळाव्याला नाशिक जिल्हा सामान्य प्रमुख प्रकाश शिंदे यांच्यासह धुळे, बीड, परभणी, जालना, नांदेड, ठाणे, पुणे, नगर आणि नाशिकसह राज्यातील विविध जिल्ह्यांचे समन्वय प्रमुख मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी दूध भेसळमुक्ती योद्धा भाऊसाहेब बैरागी, भगवान कोळपे, सचिन कोळपे , बापू शिंदे, शशिकांत ठोक, बंडू गेठे यांची प्रमुख उपस्थिती होती. धनगर समाजाच्या एसटी आरक्षणाच्या अंमलबजावणीच्या मागणीसाठी राज्यव्यापी चळवळीची पुढील दिशा या मेळाव्यात निश्चित करण्यात आली असून, आगामी काळात रथयात्रेच्या माध्यमातून हा लढा अधिक व्यापक करण्याचा निर्धार करण्यात आला आहे.

## थोडक्यात पण महत्त्वाचे

### चांडोली खुर्द येथे महात्मा गांधी यांची जयंती साजरी



**मंचर (समर्थ गांवकरी)**

महात्मा गांधी यांची जयंती चांडोली खुर्द ता.आंबेगाव येथील ग्रामपंचायतीमध्ये साजरी झाली. जयंतीनिमित्त उद्योजक मनोहर इंदोरे,दत्तात्रय इंदोरे,बाबाजी इंदोरे,बाळासाहेब इंदोरे, चंदू इंदोरे,लक्ष्मण इंदोरे,संदेश काटे यांच्यासह सदस्य उपस्थित होते.

### धुमाळवाडी कनॉल रोडवरीलदुचाकीचा अपघातात ; दुचाकीस्वाराचा मृत्यू

**अकोले (समर्थ गांवकरी)**



अगस्ती सहकारी साखर कारखान्यावर शुक्रवार दि. २ रोजी कामाला जात असतानाधुमाळवाडी कनॉल रोडवर दुचाकीचाअपघात होऊन दुचाकीस्वाराचा मृत्यू झाला आहे.सविस्तर वृत्त असे की, अकोले तालुक्यातील धुम ाळवाडी शिवारातील पाण्याची टाकी परिसरातील दिलीप गेनु लोहकरे हे नेहमी प्रम ाणेअगस्ती सहकारी साखर कारखान्यावर कामाला निघाले होते. रस्त्यात दुचाकी स्लीप झाल्याने अपघात झाला. त्यांनाउपचारासाठी अकोले शहरातील खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले, डॉ. भांडकोळी यांनी औषधोपचार केले, मात्र डोक्याला गंभीर दुखापत झाल्याने डॉक्टरानी त्यांना मृत घोषित केले. त्यांच्या पश्चात पत्नी, मुले, भाऊ असा परिवार आहे. पुरुषोत्तम लोहकरे यांचे ते वडील होत.

### नाशिकमध्ये कांद्याच्या दरात घसरण पण ग्राहकांना ग्राहकांना दिलासा नाही

जवळपास महिनाभर कांद्याने घाऊक बाजारात उच्चांकी दर गाठलेला असताना आता नाशिकमध्ये घाऊक कांद्याचे दर घसरले आहेत. कारण कर्नाटक आणि आंध्र प्रदेशातून होणाऱ्या नवीन आवकेमुळे देशातील सर्वात मोठी कांदा बाजारपेठ असलेल्या लासलगाव येथील दरांवरील ताण कमी झाला आहे. सप्टेंबरच्या सुरुवातीला लासलगावमध्ये चांगल्या प्रतीचा कांदा घाऊक दरात ५५ रुपये प्रति किलो तर निकृष्ट कांदा हा ४५ रुपये प्रति किलोने विकला जात होता.



आता महिन्याभरानंतर हे दर घसरले असून चांगल्या प्रतीचे दर ४६ रुपये तर निकृष्ट प्रतीचे दर ३५ रुपये प्रति किलोवर आले आहेत. कर्नाटक आणि आंध्रप्रदेशातून कांद्याची उपलब्धता वाढल्यामुळे दरात घट झाली असल्याचे लासलगाव एपीएमसीच्या संचालकांनी सांगितले. कर्नाटकातील मंडईमध्ये सध्या घाऊक दर हे मालाच्या गुणवत्तेनुसार ३५ ते ५१ रुपये प्रति किलो इतके आहेत. मात्र हॉटेल उद्योगाकडून नाशिकच्या कांद्यांना असलेली मागणी मजबूत असल्याचे आणि लासलगावमधील दरांमध्ये आणखी लक्षणीय घट होण्याची शक्यता नसल्याचे देखील संचालकांनी त्यांनी सांगितले.

### दुष्काळी परिस्थितीत बालकांच्या पोषण व संरक्षणासाठी समन्वयाने नियोजन करावे

**मंत्री आदिती तटकरे**

**मुंबई (समर्थ गांवकरी)**

दुष्काळग्रस्त घोषित २६५ तालुक्यांपुरते नियोजन मर्यादित न ठेवता सर्व ३५८ तालुक्यांतील परिस्थितीचा विचार करून अंगणवाडी केंद्रांमधील आहार व पाणीपुरवठा, स्थलांतरित कुटुंबांतील बालकांची सुरक्षित निवासव्यवस्था आणि बालविवाह प्रतिबंधासाठी जिल्हा व तालुका यंत्रणांनी समन्वयाने नियोजन करावे. प्रादेशिक क्षेत्रातील शासकीय वसतीगृह, बालगृहात स्थलांतरीत कामगारांच्या बालकांना निवारा देण्याच्या दृष्टीने नियोजन करण्याचे निर्देश महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी दिले. दुष्काळाच्या दृष्टीने महिला व बालकांना संरक्षण, अंगणवाडीतील पोषण आहार वितरण, बालविवाह प्रतिबंध यासंदर्भात मंत्रालयात बैठक झाली. यावेळी त्या बोलत होत्या. बैठकीस आयुक्त वर्षा लड्डा, एकात्मिक बालविकास प्रकल्प सेवा योजनेच्या आयुक्त माधवी सरदेशमुख, राज्य महिला आयोगाच्या सदस्य सचिव नंदिनी आवाडे, उपायुक्त जे. बी. गिरासे, उपायुक्त वर्षा पवार, राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाच्या सचिव वंदना जैन आदि अधिकारी उपस्थित होते.

महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे म्हणाल्या की, अंगणवाडी केंद्रांमार्फत बालकांना आहाराचा नियमित पुरवठा करण्यासाठी आहार समितीची बैठक घेऊन तालुकानिहाय परिस्थितीचा आढावा घ्यावा. जिल्हाधिकाऱ्यांनी जिल्हास्तरीय समितीची बैठक घेऊन संभाव्य दुष्काळी परिस्थितीनुसार पुढील नियोजन करावे. सीडीपीओ, डीपीओ, मुख्य कार्यकारी अधिकारी आणि संबंधित अधिकाऱ्यांनी एकत्रित आराखडा तयार करून आवश्यक बदल निश्चित करावेत. दुष्काळी परिस्थितीत अंगणवाडी केंद्रांना पुरेसे पाणी उपलब्ध राहणे आवश्यक आहे. ज्या भागांत टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू आहे, तेथे अंगणवाडी केंद्रांनाही आवश्यक प्रमाणात पाणी मिळेल, याची संबंधित यंत्रणांनी दक्षता घ्यावी.

# पालकमंत्री राधाकृष्ण विखे- राम शिंदे- बाळासाहेब थोरात एकत्र येणार

## जिल्हा बँक निवडणूक बिनविरोध

**अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)**

अहिल्यानगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या पंचवार्षिक निवडणुकीची प्रक्रिया सुरू असतानाच संगमनेर येथे काँग्रेसचे ज्येष्ठ नेते तथा माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीमुळे जिल्ह्यातील सहकार क्षेत्रातील राजकीय हालचालींना वेग आला आहे.

जिल्हा बँकेची निवडणूक बिनविरोध करण्यासाठी विविध पातळ्यांवर चर्चा सुरू असताना आता या प्रक्रियेत पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे आणि बाळासाहेब थोरात हे एकत्र बसून तोडगा काढतील, असे भाजपचे प्रदेश उपाध्यक्ष तथा माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील यांनी स्पष्ट केले.

जिल्हा बँकेच्या निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असून, इच्छुकांची संख्या मोठी आहे. त्याचवेळी निवडणूक बिनविरोध करण्यासाठी प्रमुख नेत्यांकडून प्रयत्न सुरू असल्याची चर्चा आहे.संगमनेर येथे बाळासाहेब थोरात यांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीनंतर या चर्चेला आणखी वेग आला आहे. या बैठकीच्या पार्श्वभूमीवर महायुती तसेच महाविकास आघाडीतील राजकीय समीकरणांबाबत विविध चर्चा सुरू झाल्या आहेत.

या पार्श्वभूमीवर सुजय विखे पाटील यांनी जिल्हा बँकेच्या निवडणुकीबाबत आपली भूमिका स्पष्ट केली. उमेदवारी अर्ज भरण्याची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे आणि बाळासाहेब थोरात हे तिघे एकत्र बसून या निवडणुकीबाबत तोडगा काढतील, असे त्यांनी सांगितले.

‘कोणालाही दूर ठेवले जाणार नाही’

जिल्हा बँकेच्या निवडणुकीसंदर्भात सुरू असलेल्या चर्चेत कोणत्याही नेत्याला किंवा घटकाला दूर ठेवले जाणार नाही, असेही सुजय विखे पाटील यांनी स्पष्ट केले. सर्वांना विश्वासात घेऊन मार्ग काढण्याचा प्रयत्न केला जाईल, अशी भूमिका त्यांनी मांडली. त्यामुळे निवडणूक बिनविरोध करण्याच्या चर्चेला आता प्रमुख नेत्यांच्या बैठकीचे स्वरूप येण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांनी घेतलेल्या भूमिकेबाबत विचारले असता विखे पाटील यांनी सांगितले की, जिल्हा बँकेच्या संदर्भात बाळासाहेब थोरात यांनी संगमनेर येथे बैठक बोलावली होती. आपल्याला ज्याप्रमाणे फोन आला, त्याचप्रमाणे इतरांनाही संपर्क करण्यात आला होता. त्यामुळे या बैठकीकडे कोणत्याही एका राजकीय गटाची बैठक म्हणून पाहण्यापेक्षा सर्व संबंधितांना विश्वासात घेण्याच्या प्रक्रियेचा भाग म्हणून पाहिले जात असल्याचे त्यांच्या वक्तव्यातून स्पष्ट झाले.

## कुस्तीच्या आखाड्यात तन्वी सरोदेची दमदार कामगिरी

**आमदार काशिनाथ दाते सरांकडून अभिनंदन**

**पारनेर (समर्थ गांवकरी)**

वडगाव सावताळच्या पै. तन्वी सरोदेने ७६ किलो वजन गटात पटकावले सुवर्णपदक; जिल्ह्यात प्रथम क्रमांक मिळवत विभागीय स्पर्धेसाठी केली पात्रता

पारनेर तालुक्यातील वडगाव सावताळ येथील विद्यार्थिनी पै. तन्वी दत्तात्रय सरोदे हिने शालेय जिल्हास्तरीय कुस्ती स्पर्धेत दमदार कामगिरी करत अहिल्यानगर जिल्ह्यात प्रथम क्रमांक पटकावला. १९ वर्षांखालील वयोगटातील ७६ किलो वजन गटात तन्वीने निकाली कुस्ती करत सुवर्णपदक मिळविले. तिच्या या उल्लेखनीय यशाबद्दल पारनेर–नगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार काशिनाथ दाते सर यांनी तिचे अभिनंदन करत पुढील वाटचालीसाठी मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या.

पै. तन्वी सरोदे ही जिल्हा मराठा शिक्षण प्रसारक मंडळाच्या न्यू इंग्लिश स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज, पारनेर येथे शिक्षण घेत आहे. कुस्ती क्षेत्रातील तिच्या या यशामागे तालुका क्रीडा अध्यक्ष मा. बापूसाहेब होळकर सर, आंतरराष्ट्रीय कुस्ती कोच पै. भुजबळ सर, वस्ताद पै. गणेश जाधव सर, वस्ताद पै. युवराज पठारे, एन.आय.एस. कुस्ती कोच पै. विवेक नायकल सर, वस्ताद श्री. प्रमोद गोडसे, चुलते वस्ताद श्री. सखाराम भोबाळ (नाना), वस्ताद श्री. कोंडीबा बरकडे तसेच तिच्या सर्व शिक्षकांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

जिल्हास्तरीय स्पर्धेत सुवर्णपदक पटकावल्यानंतर पै. तन्वी सरोदे हिची आता विभागीय पातळीवरील स्पर्धेसाठी



निवड झाली आहे. ग्रामीण भागातून पुढे येत कुस्तीच्या आखाड्यात आपल्या कौशल्याची छाप उमटविणाऱ्या तन्वीच्या या यशाचे वडगाव सावताळसह पारनेर तालुक्यात कौतुक होत आहे.

कुस्ती क्षेत्रात तन्वीने मिळविलेले हे यश अभिमानास्पद असून, तिने विभागीय स्पर्धेतही उत्कृष्ट कामगिरी करत आपल्या गावाचे, कुटुंबाचे आणि पारनेर तालुक्याचे नाव उज्वल करावे, अशा शुभेच्छा आमदार काशिनाथ दाते सर यांनी पै. तन्वी सरोदे हिला दिल्या.

## गावडेवाडीत बिबट्याचा पोल्ट्री फार्मवर हल्ला; ३०० कोंबड्या ठार

**मंचर (समर्थ गांवकरी)**

गावडेवाडी (ता.आंबेगाव) येथे प्रवीण वायाळ यांच्या पोल्ट्री फार्मवर रविवार दि.४ रोजी पहाटे बिबट्याने हल्ला करून सुमारे ३०० कोंबड्या ठार केल्या.या घटनेत पोल्ट्री व्यावसायिकाचे अंदाजे ४५ हजार रुपयांचे नुकसान झाल्याचे सांगण्यात आले.

पोल्ट्री फार्मची जाळी कमकुवत असल्याने बिबट्याने ती सहज तोडून आत प्रवेश केला. त्यानंतर कोंबड्यांची शिकार करून त्याने परिसरात धुमाकूळ घातला. पोल्ट्री फार्मच्या लगतच ऊसाचे पीक असून, या परिसरात बिबट्याच्या पायांचे ठसे आढळून आले आहेत. त्यामुळे परिसरात बिबट्याचा वावर असल्याचे स्पष्ट झाले आहे.घटनेची माहिती मिळताच वन विभागाच्या कर्मचाऱ्यांनी घटनास्थळी पाहणी करून मृत कोंबड्यांचा पंचनामा केला. नुकसानग्रस्त पोल्ट्री व्यावसायिकाला नियम ानुसार नुकसानभरपाई मिळण्यासाठी वन विभागामार्फत कार्यवाही सुरू करण्यात आली आहे. तसेच परिसरात वावरणाऱ्या बिबट्याचा शोध घेऊन त्याला लवकरात लवकर जेरबंद करण्यासाठी आवश्यक कार्यवाही करण्यात येणार आहे.पोल्ट्री फार्ममध्ये जवळपास साडेपाच ते सहा हजार कोंबड्या होत्या.



**गावडेवाडी येथे बिबट्याच्या हल्ल्यात मृत झालेल्या कोंबड्यांचा पंचनामा करण्यात आला आहे. नुकसानभरपाईसाठी आवश्यक कार्यवाही सुरू आहे. बिबट्याचा शोध घेऊन त्याला जेरबंद करण्यासाठी वन विभागाकडून तातडीने उपाययोजना करण्यात येतील. विकास भोसले वनपरिक्षेत्राधिकारी मंचर.**

त्यातील ३०० कोंबड्या त्यांनी ठार केल्या.कोंबड्या अंदाजे २० ते २२ दिवसांच्या होत्या. अचानक झालेल्या या हल्ल्यामुळे पोल्ट्री व्यावसायिकाचे मोठे आर्थिक नुकसान झाले असून, परिसरातील नागरिकांम ध्येही भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

## मुंबई जिल्हाधिकारी कार्यालयात ‘सेवा संकल्प अभियान’ अंतर्गत स्वच्छता अभियान

**स्वच्छ, नीटनेटके कार्यालय आणि कार्यक्षम कार्यसंस्कृतीचा अधिकारी–कर्मचाऱ्यांचा संकल्प**

**मुंबई (समर्थ गांवकरी)**

राष्ट्रपिता महात्मा गांधी आणि माजी पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांच्या जयंतीचे औचित्य साधून तसेच ‘सेवा संकल्प अभियाना’च्या अनुषंगाने मुंबई शहर जिल्हाधिकारी कार्यालयात दि. २ ऑक्टोबर रोजी विशेष स्वच्छता अभियान उत्साहात राबविण्यात आले. जिल्हाधिकारी आंचल गोयल यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या अभियानात अधिकारी व कर्मचाऱ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेत कार्यालय परिसराची स्वच्छता केली.

अभियानाच्या प्रारंभी महात्मा गांधी आणि लालबहादूर शास्त्री यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर जिल्हाधिकारी आंचल गोयल, निवासी उपजिल्हाधिकारी डॉ. शिवनंदा लंगडापुरे, अधीक्षक नगर भूमापन व भूमी अभिलेख शिवदास गुंड, सर्व उपजिल्हाधिकारी, तहसीलदार, नायब तहसीलदार तसेच कार्यालयातील अधिकारी–कर्मचाऱ्यांनी स्वच्छता अभियानात सहभाग घेतला.

यावेळी कार्यालय परिसरातील विविध ठिकाणी सखोल स्वच्छता करण्यात आली. त्यासोबतच प्रत्येक प्रशासकीय शाखा व विभाग कक्षाम ध्ये फायलींची शिस्तबद्ध मांडणी, नस्तीकरण व कक्ष स्वच्छतेची विशेष मोहीम राबविण्यात आली. कार्यालयातील कागदपत्रे आणि नोंदी व्यवस्थित ठेवून कार्यकक्ष अधिक सुटसुटीत करण्यावर भर देण्यात आला.

## पुणे जिल्ह्यातील आंबेगाव,जुन्नर सह सर्वच तालुक्यात दुष्काळ जाहीर करा...किसान सभेची मागणी

**मंचर (समर्थ गांवकरी)**

पुणे जिल्ह्यातील जुन्नर, आंबेगाव, म ावळ, मुळशी व हवेली या तालुक्यांचा राज्य सरकारने जाहीर केलेल्या दुष्काळी यादीत समावेश झालेला नाही.दुष्काळी परिस्थिती असल्यामुळे संबंधित तालुके दुष्काळी म्हणून जाहीर करावी.अन्यथा आंदोलन करावे लागेल.असा इशारा किसान सभेने दिला आहे.

महाराष्ट्र शासनाने खरीप हंगाम २०२६ मधील दुष्काळ परिस्थितीच्या अनुषंगाने, दिनांक २५ सप्टेंबर,२०२६ रोजी शासन निर्णय काढून राज्यातील २६५ तालुक्यांमध्ये दुष्काळ जाहीर करून विविध उपाययोजना व सवलती लागू केल्या आहेत.सदर यादीमध्ये, पुणे जिल्ह्यातील भोर, राजगड (वेल्हा), खेड, शिरूर, बारामती, इंदापूर, दौंड व पुरंदर या आठ तालुक्यांचा समावेश करण्यात आला आहे.मात्र पुणे जिल्ह्यातील जुन्नर, आंबेगाव, मावळ, मुळशी व हवेली या तालुक्यांचा या यादीत समावेश झालेला नाही. पुणे जिल्ह्यातील अनेक भागांमध्ये पावसाचे असमान वितरण, पावसातील खंड,पिकांचे नुकसान, पाणीटंचाई, शेतीवरील वाढता खर्च आणि खरीप पिकांच्या उत्पादनावर झालेला परिणाम यामुळे शेतकरी व ग्रामीण जनतेसमोर गंभीर परिस्थिती निर्माण झाली आहे. विशेषतः तालुकास्तरावरील सरासरी आकडेवारीच्या आधारे संपूर्ण तालुक्याची परिस्थिती एकसारखी असल्याचे गृहीत धरणे योग्य ठरणार नाही.अनेक गावांम ध्ये व महसूल मंडळांमध्ये पर्जन्यमान, पिकांची स्थिती, उपलब्ध पाणीसाठा आणि शेतीवरील परिणाम यामध्ये मोठी तफावत आहे. त्यामुळे दुष्काळाचे मूल्यांकन वस्तुनिष्ठ निकषांवर करून,पुणे जिल्ह्यातील सर्वच वंचित तालुक्यांचा फेरआढावा घेऊन या तालुक्यात दुष्काळ जाहीर करा. अशी मागणी किसान सभा पुणे जिल्हा समितीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व पुणे जिल्हाधिकारी यांचेकडे ईमेलने केली आहे.दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर पुणे सर्वच जिल्ह्यातील, तालुक्यातील शेतकरी,शेतमजूर यांना भरीव आर्थिक मदत द्यावी.दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांची शेतीशी सबंधित सर्व कर्जे माफ करावीत.लोकांना गावातच रोजगार उपलब्ध व्हावा.यासाठी रोजगार हमी कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करावी.या सारख्या विविध उपाययोजना राज्यशासनाने तातडीने राबविणे सुरु करावे.अशी मागणी निवेदनाच्या माध्यमातून किसान सभेच्या वतीने करण्यात आली आहे.आंबेगाव,जुन्नर तालुक्यासह जिल्ह्यातील सर्वच तालुक्याचा समावेश, दुष्काळग्रस्त तालुक्याच्या यादीत न झाल्यास किसान सभेच्या वतीने, पुढील काळात तीव्र आंदोलन केले जाईल.असा इशारा किसान सभेचे डॉ. अमोल वाघम ारे,महेंद्र थोरात,अशोक पेकारी,एड.नाथा शिंगाडे,अमोद गरुड,लक्ष्मण जोशी,संतोष कांबळे,राजू घोडे कमल बांबळे,बाळासाहेब शिंदे, मुकुंद घोडे,दत्तात्रय बर्डे भीमाबाई कोकणे यांनी केली आहे.

# सायबर विश्वात मुलींना जाळ्यात ओढणाऱ्या विकृताला ५ वर्षे सक्तमजुरी

**■ बनावट फेसबुक खात्याद्वारे अल्पवयीन मुलींचा विनयभंग करणाऱ्या मंगेश तांबेला**

**■ ठाणे न्यायालयाचा दणका; ५० हजार रुपयांचा दंड पीडितांना देण्याचे आदेश**

**ठाणे (समर्थ गांवकरी)**

सोशल मीडियाचा गैरवापर करून अल्पवयीन मुलींना अश्लील मेसेज, फोटो आणि व्हिडिओ पाठवून त्यांचा विनयभंग व मानसिक छळ करणाऱ्या एका विकृत तरुणाला ठाणे जिल्हा व सत्र न्यायालयाने कठोर शिक्षा सुनावली आहे.

जिल्हा व सत्र न्यायाधीश डॉ. अनिता नेवसे यांनी आरोपी मंगेश ईश्वरदास तांबे (वय २८, रा. उत्तन) याला माहिती तंत्रज्ञान कायद्यांतर्गत ५ वर्षे सक्तमजुरी व ५० हजार रुपये दंड, तसेच भादंवि कलम ३५४(अ) अन्वये ३ वर्षे सक्तमजुरी व १० हजार रुपये दंडाची शिक्षा ठोठावली. दंडाची ही रक्कम पीडितांना नुकसान भरपाई म्हणून देण्याचे आदेशही न्यायालयाने दिले आहेत.

सागरी उत्तन पोलीस ठाण्याच्या हद्दीत राहणाऱ्या आरोपी मंगेश तांबे याने डिसेंबर २०१७ ते मार्च २०१८ या कालावधीत सायबर गुन्हेगारीचा कुटील डाव रचला होता. त्याने सुरुवातीला फ ेसबुकवर ‘विद्या’ या नावाने मुलीचे खोटे प्रोफाईल तयार केले आणि फिर्यादी तरुणीला ‘फ्रेंड रिक्वेस्ट’ पाठवली. समोरील व्यक्ती मुलगीच आहे असे वाटल्याने फिर्यादीने ती विनंती स्वीकारली. मात्र, चॅटिंगदरम्यान आरोपीने हळूहळू अश्लील फोटो पाठवण्यास सुरुवात केली. संशय आल्याने फिर्यादीने थेट व्हिडिओ कॉल केला असता स्क्रीनवर मुलगी नसून एक पुरुष असल्याचे उघड झाले. या प्रकाराने घाबरलेल्या फिर्यादीने त्याचा नंबर तात्काळ ब्लॉक केला.

बदल्याच्या भावनेतून विकृतीची परिसीमा..

नंबर ब्लॉक केल्याच्या रागातून आरोपी मंगेश तांबे याने फिर्यादीच्याच नावाने बनावट फेसबुक अकाउंट उघडले. या बनावट खात्यावरून त्याने फिर्यादीची चुलत बहीण आणि तिच्या अल्पवयीन मैत्रिणींना अत्यंत अश्लील मेसेज, फोटो व व्हिडिओ पाठवण्यास सुरुवात केली. एवढ्यावरच न थांबता, मुलींना धमकावून त्यांचे लैंगिक शोषण करण्याचा प्रयत्न केला आणि तंत्रज्ञानाच्या आधारे त्यांच्या लज्जेचे धिंडवडे काढले. अखेर या त्रासाला कंटाळून फिर्यादीने सागरी उत्तन पोलीस ठाण्यात धाव घेऊन तक्रार दाखल केली.

पोलिसांनी आरोपीविरुद्ध विनयभंग, पोक्सो आणि माहिती तंत्रज्ञान कायद्यान्वये गुन्हा दाखल करून त्याला गजाआड केले.

न्यायालयात सरकारी पक्षाचा भक्कम युक्तिवाद

खटल्याची सुनावणी ठाणे सत्र न्यायालयात पार पडली. सरकारी पक्षाच्या वतीने सहाय्यक सरकारी वकील श्रीमती भामरे–पाटील यांनी अत्यंत प्रभावी युक्तिवाद केला. आरोपीचा गुन्हा सिद्ध करण्यासाठी सरकारी पक्षाने तब्बल ९ महत्त्वाचे साक्षीदार तपासले. साक्षीदारांचे जबाब, डिजिटल पुरावे आणि सादर करण्यात आलेले कागदपत्रे ग्राह्य धरून न्यायालयाने आरोपीला दोषी ठरवले. या न्यायालयीन काम काजात सरकारी वकिलांना कोर्ट पैरवी पोलीस हवालदार दिलीप सनेर यांनी मोलाचे सहकार्य केले.

न्यायालयाचा निकाल व शिक्षा:

माहिती तंत्रज्ञान अधिनियम (कलम ६७ अ): ५ वर्षे सक्तमजुरी आणि ५० हजार रुपये दंड (दंड न भरल्यास ६ महिने अतिरिक्त कारावास).

भादंवि (कलम ३५४ अ – विनयभंग): ३ वर्षे सक्तमजुरी आणि १० हजार रुपये दंड.

पीडितांना दिलासा: न्यायालयाने आरोपीकडून वसूल करण्यात येणारी दंडाची रक्कम पीडितांना नुकसानभरपाई म्हणून देण्याचे निर्देश दिले आहेत.

सोशल मीडियावर अनोळखी व्यक्तींशी संवाद साधताना आणि फ्रेंड रिक्वेस्ट स्वीकारताना सतर्क राहणे किती गरजेचे आहे, हे या घटनेवरून पुन्हा एकदा समोर आले आहे. तसेच तंत्रज्ञानाचा गैरवापर करून महिला व मुलींची विटंबना करणाऱ्यांची गय केली जाणार नाही, असा सज्जड इशाराच या निकालातून समाजात गेला आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.

पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, ॲड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे

पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ४०६, व्यंकटेश विश्व, अभिरूची परिसर समोर, पारे कंपनी रोड, नऱ्हे, पुणे – ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : अ–१, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)/

कोकण विभागीय कार्यालयाचा पत्ता : शकुंतल बिल्डिंग, गाळा क्र. २, सेक्टर ५, कोपरखैरणे, नवी मुंबई ४००७०९

# वडिलांच्या वेशभूषेत अक्षय कर्डिलेंचा जिल्हा बँकेत प्रवेश

## दिवंगत आमदार शिवाजीराव कर्डिलेंच्या आठवणींना उजाळा; सहकाराच्या माध्यमातून वडिलांचा वारसा पुढे नेण्याचा निर्धार

**अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)**

अहिल्यानगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीची रणधुमाळी सुरू असतानाच राहुरी विधानसभा मतदारसंघाचे भाजप आमदार अक्षय कर्डिले यांनी आज उमेदवारी अर्ज दाखल केला. मात्र यावेळी त्यांच्या उमेदवारीपेक्षा त्यांची वेशभूषा अधिक चर्चेचा विषय ठरली.

उमेदवारी अर्ज दाखल करताना अक्षय कर्डिले यांनी आपले वडील तथा दिवंगत आमदार शिवाजीराव कर्डिले यांच्या परिचित वेशभूषेची आठवण करून देणारा पेहराव केला. त्यामुळे अर्ज दाखल करण्याच्या निमित्ताने वडिलांच्या आठवणींना उजाळा मिळाला.

शिवाजीराव कर्डिले यांनी आपल्या प्रदीर्घ राजकीय कारकिर्दीत शेतकरी, सहकार आणि ग्रामीण भागातील प्रश्नांवर काम करत स्वतंत्र राजकीय ओळख निर्माण केली. त्याच कार्याची आठवण करून देणाऱ्या वेशभूषेत अक्षय कर्डिले यांनी जिल्हा बँकेच्या निवडणुकीच्या मैदानात प्रवेश केला.

वडिलांचा वारसा आता माझी जबाबदारी!

यावेळी अक्षय कर्डिले यांनी आपल्या वडिलांच्या कार्याचा उल्लेख करत जिल्हा बँकेच्या माध्यमातून शेतकरी आणि सर्वसामान्यांसाठी काम करण्याचा निर्धार व्यक्त केला. माझ्या वडिलांनी ज्या पद्धतीने काम केले, त्याच पद्धतीने जिल्हा बँकेच्या माध्यमातून पुढील काळात काम करण्याचा माझा प्रयत्न राहील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.त्यामुळे अक्षय कर्डिलेंचा उमेदवारी अर्ज हा केवळ निवडणुकीतील एक औपचारिक टप्पा न राहता वडिलांच्या राजकीय आणि सहकार क्षेत्रातील वारशाची आठवण करून देणारा क्षण ठरला.आता जिल्हा बँकेच्या निवडणुकीत अक्षय कर्डिले यांची भूमिका काय राहणार, तसेच सहकाराच्या राजकारणात ते शिवाजीराव कर्डिले यांचा वारसा कितपत आणि कोणत्या पद्धतीने पुढे नेतात, याकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

# सेवा संकल्प अभियानांतर्गत अनुकंपा तत्वावर पदभरती व पदोन्नती आदेशांचे वितरण

## सामान्य प्रशासन विभागातील वर्ग-४ मधील तीन कर्मचारी यांना आरोग्य संवर्गातील वर्ग ३ पदावर पदोन्नती तसेच वर्ग-४ पदावर अनुकंपा तत्वावर पदभरती

**ठाणे (समर्थ गांवकरी)**

सेवा संकल्प अभियानांतर्गत जिल्हा परिषद, ठाणेच्या सामान्य प्रशासन विभागातील वर्ग-४ मधील तीन शिपाई कर्मचारी यांना पदोन्नतीने आरोग्य संवर्गातील आरोग्य सेवक पुरूष या पदावर पदोन्नतीने नियुक्ती तसेच वर्ग ४ शिपाई पदावर अनुकंपा तत्वावर पदभरतीने नियुक्ती देण्यात आली. या अनुषंगाने पदभरती व पदोन्नती आदेशांचे वितरण आज, दि. ०५ ऑक्टोबर, २०२६ रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी रणजित यादव यांच्या हस्ते त्यांच्या दालनात करण्यात आले.

सेवाकाळात कर्मचाऱ्याचा मृत्यू झाल्यानंतर त्यांच्या कुटुंबीयांना निर्माण होणाऱ्या आर्थिक अडचणी लक्षात घेऊन पात्र वारसांना अनुकंपा तत्वावर शासकीय सेवेत संधी देण्यात येते. या माध्यमातून संबंधित कुटुंबाला आर्थिक आधार मिळण्यासोबतच कुटुंबाच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न काही प्रमाणात मार्गी लागण्यास मदत होते. सेवा संकल्प अभियानांतर्गत पात्र प्रकरणांवर आवश्यक कार्यवाही करून अनुकंपा पदभरतीची प्रक्रिया पूर्ण करण्यात आली.

तसेच, जिल्हा परिषदेच्या सामान्य प्रशासन विभागाचे वर्ग-४ मधील तीन कर्मचाऱ्यांना त्यांच्या सेवाकाळातील पात्रता व नियमानुसार आरोग्य सेवक पुरूष वर्ग-३ पदावर पदोन्नती देण्यात आली. पदोन्नतीमुळे संबंधित कर्मचाऱ्यांना त्यांच्या सेवेत पुढील जबाबदाऱ्या पार पाडण्याची संधी मिळणार असून, त्यांच्या अनुभवाचा आणि कार्यक्षमतेचा विभागाच्या कामकाजासाठी उपयोग होणार आहे.

यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी रणजित यादव यांनी पदोन्नती प्राप्त कर्मचाऱ्यांचे अभिनंदन करताना त्यांना नवीन पदाची जबाबदारी सक्षमपणे पार पाडण्यासाठी शुभेच्छा दिल्या. शासकीय सेवेत नागरिकांना दर्जेदार व वेळबद्ध सेवा देणे ही अधिकारी-कर्मचाऱ्यांची महत्त्वाची जबाबदारी असून, पदोन्नती नंतरही सेवाभाव, कर्तव्यनिष्ठा आणि पारदर्शकता यांना प्राधान्य देऊन काम करण्याचे आवाहन त्यांनी केले. अनुकंपा तत्वावर नियुक्ती मिळालेल्या कर्मचाऱ्याचेही यावेळी अभिनंदन करण्यात आले. शासनाच्या नियमांनुसार पात्र प्रकरणांमध्ये वेळेत कार्यवाही करून लाभार्थ्यांना आवश्यक सेवा-संधी उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने प्रशासनाकडून प्रयत्न करण्यात येत असल्याचे यावेळी नमूद करण्यात आले.



या कार्यक्रमास उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) अविनाश फडतरे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. गंगाधर परगे, जिल्हा माता व बालसंगोपन अधिकारी डॉ. स्वाती पाटील तसेच जिल्हा परिषदेचे विविध विभागांतील अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते. सेवा संकल्प अभियानाच्या माध्यमातून कर्मचारी कल्याण, प्रशासकीय कार्यक्षमता आणि वेळबद्ध सेवा यांना प्राधान्य देत जिल्हा परिषद ठाणेच्या वतीने विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत.

# पालकमंत्री विखेंच्या उपस्थितीत पारनेरमध्ये ७ ऑक्टोबरला आढावा बैठक : आमदार काशिनाथ दाते सर

## टंचाई व जलजीवन मिशनच्या कामांचा गावनिहाय आढावा

**पारनेर (समर्थ गांवकरी)**

सोमवार दि. ५ आक्टो. २०२६ पारनेर-नगर विधानसभा मतदारसंघातील सध्याची दुष्काळी परिस्थिती, पाणीटंचाई तसेच जलजीवन मिशन अंतर्गत सुरू असलेल्या व पूर्ण झालेल्या विविध कामांचा आढावा घेण्यासाठी बुधवार, दि. ७ ऑक्टोबर २०२६ रोजी दुपारी २ वाजता लक्ष्मीनारायण मंगल कार्यालय, पारनेर येथे विशेष आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले असून ही विशेष बैठक अहिल्यानगर जिल्ह्याचे पालकमंत्री नामदार राधाकृष्ण विखे पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडणार असल्याची माहिती मतदारसंघाचे आमदार काशिनाथ दाते सर यांनी दिली.

सध्या मतदारसंघातील विविध गावांमध्ये निर्माण झालेली पाणी व चारा टंचाई आणि दुष्काळी परिस्थिती लक्षात घेता या बैठकीत गावनिहाय पाणी, चारा उपलब्धतेचा आढावा घेऊन आवश्यक उपाययोजनांवर चर्चा करण्यात येणार आहे. विशेषतः जलजीवन मिशन अंतर्गत पूर्ण झालेल्या योजनांचा अद्याप प्रत्यक्ष पाणीपुरवठ्यासाठी वापर का सुरू झालेला नाही, याची कारणे तपासण्यात येणार आहेत. तसेच ज्या योजना किरकोळ किंवा अल्प प्रमाणात अपूर्ण आहेत, त्या तातडीने पूर्ण करून संबंधित गावांना पाणीपुरवठा सुरू करता येईल का, याबाबतही बैठकीत चर्चा केली जाणार आहे. ज्या योजना अद्याप अपूर्ण आहेत, त्या कोणत्या कारणांमुळे रखडल्या आहेत, त्यातील अडचणी कोणत्या आहेत आणि त्या दूर करण्यासाठी कोणत्या उपाययोजना करता येतील, याचा गावनिहाय आढावा घेण्यात येणार असल्याचे आमदार काशिनाथ दाते सर यांनी सांगितले.



पूर्ण झालेल्या योजनांचा लाभ नागरिकांना प्रत्यक्ष मिळणे आवश्यक आहे. केवळ योजना पूर्ण झाल्याची नोंद न राहता त्या योजनांच्या माध्यमातून संबंधित गावांना प्रत्यक्ष पाणी मिळावे, यासाठी आवश्यक त्या उपाययोजना करण्यावर या बैठकीत भर दिला जाणार आहे, असे आमदार काशिनाथ दाते सर यांनी सांगितले. या आढावा बैठकीसाठी पारनेर तालुक्यातील सर्व विभागांचे अधिकारी, पदाधिकारी, शेतकरी बांधव तसेच नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आमदार काशिनाथ दाते सर यांनी केले आहे. दुष्काळी परिस्थितीत पाणीप्रश्नाला प्राधान्य देत जलजीवन मिशनच्या प्रलंबित व अपूर्ण कामांना गती देऊन प्रत्यक्ष पाणीपुरवठा सुरळीत करण्याच्या दृष्टीने ही बैठक महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

**सध्या संपूर्ण तालुक्यात सुरू असलेल्या पीक नुकसानीच्या पंचनाम्याचाही बैठकीत आढावा घेतला जाणार आहे. शेतकऱ्यांच्या नुकसानीची प्रत्यक्ष नोंद करताना येणाऱ्या अडचणी, पंचनाम्याची कार्यवाही, तसेच शेतकरी लॉगिनच्या माध्यमातून पीक पाहणीची नोंद करताना शेतकऱ्यांना येणाऱ्या तांत्रिक व इतर अडचणी याबाबतही संबंधित अधिकाऱ्यांकडून माहिती घेण्यात येणार आहे. या अडचणी दूर करून पात्र शेतकऱ्यांच्या नुकसानीची योग्य प्रकारे नोंद होण्यासाठी आवश्यक कार्यवाहीबाबत बैठकीत चर्चा होणार आहे.**

# सरसकट पंचनामे करा; आढळा धरणाच्या पाटपाण्याचे योग्य नियोजन करा

**डोंगरगाव (समर्थ गांवकरी)**

अकोले तालुक्यात दुष्काळ जाहीर करण्यात आला असून, विविध भागांत पंचनाम्याचे काम सुरू आहे. मात्र डोंगरगाव येथील शेतकऱ्यांच्या नुकसानीचे सरसकट पंचनामे करून कोणतेही निकष न लावता तातडीने मदत द्यावी, अशी मागणी डोंगरगावचे माजी सरपंच बाबासाहेब उगले यांनी पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडे निवेदनाद्वारे केली.

अकोले तालुक्यातील डोंगरगाव येथील शेतकऱ्यांच्या शेतीचे सरसकट पंचनामे करून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तातडीने आर्थिक मदत देण्यात यावी. दुष्काळाचा फटका शेतकऱ्यांसोबतच पशुधनालाही बसत असल्याने चारा छावण्यांऐवजी शेतकऱ्यांना दावणीवरच चारा उपलब्ध करून द्यावा, अशी मागणीही निवेदनात करण्यात आली आहे.

तसेच आढळा धरणाच्या पाण्याचे योग्य नियोजन करून शेतकऱ्यांना पाटपाणी उपलब्ध करून द्यावे, अशी मागणी करण्यात आली. पिकांचे



मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याने पीक विम्याची रक्कम कोणतेही अनावश्यक निकष न लावता तातडीने शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा करावी, अशीही मागणी करण्यात आली.

दुष्काळी परिस्थिती लक्षात घेऊन शासनाने या मागण्यांबाबत तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा, प्रशासनाला आवश्यक आदेश देऊन शेतकऱ्यांना दिलासा द्यावा, अशी विनंती निवेदनाद्वारे करण्यात आली.यावेळी मा.सभापती कैलासभाऊ वाकचौरे, माजी सरपंच बाबासाहेब उगले, बंडोपंत उगले, माधव ठुबे आदी उपस्थित होते.

# नगर जिल्हा बाजार समिती पतसंस्थेच्या उपाध्यक्षपदी अण्णासाहेब शेलार यांची निवड

**कर्जत (समर्थ गांवकरी)**

कर्जत तालुका कृषी उत्पन्न बाजार समितीचे निरीक्षक आणि मिरजगावचे सुपुत्र अण्णासाहेब शेलार यांची अहिल्यानगर जिल्हा बाजार समिती सेवक वर्गाची सहकारी पतसंस्थेच्या उपाध्यक्षपदी नुकतीच बिनविरोध निवड झाली आहे. शेलार हे मिरजगाव येथील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सेवेत गेल्या अनेक वर्षापासून प्रामाणिकपणे काम करत आहेत. त्यांच्या कामातील पारदर्शकता शिस्त आणि सर्वांना सोबत घेऊन जाण्याची वृत्ती यामुळे त्यांना जिल्हास्तरावर काम करण्याची जबाबदारी मिळाली आहे. त्यांच्या या निवडीबद्दल कर्जत तालुका कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती-उपसभापती, सर्व संचालक, सचिव, कर्मचारी व जिल्ह्यातील सर्व बाजार समितीच्या कर्मचाऱ्यांकडून तसेच मिरजगावसह तालुक्यामधून विविध क्षेत्रातून अभिनंदन होत आहे. यावेळी शेलार म्हणाले, अहिल्यानगर जिल्ह्यात नावलौकिक असलेल्या बाजार समिती कर्मचाऱ्यांच्या पतसंस्थेत मला उपाध्यक्ष पदावर संधी सर्व सहकार्याने प्राप्त करून दिली. त्या संधीचे मी नक्कीच सोने करेल, आणि भविष्यात कर्मचाऱ्यांच्या विविध प्रश्नांबाबत सदैव कटीबद्ध राहील, अशी ग्वाही यावेळी त्यांनी दिली.या निवडीबद्दल राजकीय, सामाजिक, शैक्षणिक विविध क्षेत्रातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे..



# शारदीय नवरात्रोत्सवाच्या पार्श्वभूमीवर श्री क्षेत्र मोहटा देवी गडावर जय्यत तयारी

**पाथर्डी (समर्थ गांवकरी)**

श्री क्षेत्र मोहटादेवी गडावर यंदाचा शारदीय नवरात्रोत्सव भाविकांसाठी अधिक सुखकर आणि सुलभ होणार असून, नवरात्रोत्सवाच्या पार्श्वभूमीवर गडावर येणाऱ्या लाखो भाविकांच्या सोयीसाठी प्रशासनाकडून विविध सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहेत. यामध्ये गडावरील मंदिराच्या पायऱ्या बनवण्याचे काम आता अंतिम टप्प्यात आले असून, नवरात्र उत्सव सुरू होण्यापूर्वी ते पूर्ण होणार आहे. गडावरील अगोदरच्या जुन्या आणि चढण्यासाठी कठीण असलेल्या पायऱ्या बदल करून त्या जागी आता अत्यंत सुलभ आणि प्रशस्त पायऱ्या बनवण्यात येत असून, यामुळे विशेषतः वयोवृद्ध नागरिक, महिला आणि लहान मुलांना गडावर चढताना होणारा त्रास आणि भाविकांची मोठी गैरसोय कायमची दूर होणार आहे; तसेच गर्दीच्या वेळी होणारी धावपळ थांबून भाविकांचा प्रवास अधिक सुरक्षित होईल.

मोहटा देवीचे भव्य मंदिर श्रीयंत्राकार आणि अध्यात्माचा एक अद्भुत नमुना मानले जाते, ज्याची संपूर्ण रचना 'श्री' यंत्राच्या म्हणजेच श्री आकाराच्या वास्तूरचनेवर आधारित असून मंदिराच्या परिसरात आणि दर्शन रांगेत चौसष्ट योगिनी आणि अष्टभैरव यांच्या मूर्तींची स्थापना करण्यात आली आहे. या अद्वितीय रचनेमुळेच या गडाला 'पूर्ण शक्तीपीठ' म्हणून ओळखले जाते, जिथे दर्शनासाठी देशभरातून भाविक येतात. येत्या ११ तारखेला शारदीय नवरात्रोत्सवास प्रारंभ होत असून, याच दिवशी मंदिरात पारंपरिक पद्धतीने घटस्थापना केली जाणार असल्याने देवस्थान ट्रस्ट आणि स्थानिक प्रशासनाने नव्या पायऱ्यांच्या



सुविधेसोबतच गडावर सुलभ दर्शन रांग, पिण्याचे पाणी, चोख सुरक्षा व्यवस्था, स्वच्छतागृहे आणि महाप्रसादाची भव्य तयारी युद्धपातळीवर सुरू आहे. नव्याने सजलेल्या पायऱ्या आणि सुविधेमुळे यंदा मोहटा देवीच्या येणाऱ्या येणाऱ्या लाखो भक्तांचा नवरात्रोत्सव अत्यंत आनंदात आणि उत्साहात पार पडणार असल्याचे देवस्थान प्रशासनाकडून सांगण्यात आले आहे.

# वारकरी शिक्षण संस्थेचे अध्यापक श्री विठ्ठल महाराज घुले बाबांची पुण्यतिथी भक्तिमय वातावरणात साजरी

**नेवासा (समर्थ गांवकरी)**

आळंदी येथील सद्गुरू जोग महाराज वारकरीशिक्षण संस्थेचे अध्यापक वैकुंठवाशी ब्रम्हलिन गुरुवर्यश्री विठ्ठलबाबाघुलेमहाराजांची १६ वी पुण्यतिथी नेवासा येथील संत ज्ञानेश्वरमहाराज पैस खांबमंदिर सभामंडपातत्यांचे शिष्य असलेल्या शेकडो विद्यार्थी कीर्तनकार मंडळींनी एकत्रित येऊन साजरी केली. क्षणाक्षणाची चांगली कृती ही पुण्याईच्या प्राप्तीसाठी आवश्यक असून संत भेटण्याकरता जीवनात पुण्य प्राप्त करण्याचा प्रयत्न करा असे आवाहन देहू येथील गाथा मंदिराचे अध्यक्षगुरुवर्य श्री पांडुरंगजी महाराज घुले यांनी यावेळी झालेल्या कीर्तन सोहळयात बोलताना केले.

संत ज्ञानेश्वरमहाराजमंदिर संस्थान नेवासा व सद्गुरू जोगमहाराजशिक्षण संस्थेचे आजी माजी विद्यार्थी यांच्या संयुक्त विद्यमाने झालेल्या वैकुंठवाशी ह.भ.प.श्री विठ्ठल महाराज घुले यांच्या १६ व्या पुण्यतिथी च्या निमित्ताने सर्व संत मंडळीच्या वतीने संत ज्ञानेश्वर माऊलींच्या पैस खांबासह गुरुवर्य श्री विठ्ठल महाराज घुले यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

वारकरी संप्रदायातील मार्गदर्शक महंत श्री भास्करगिरीजी महाराज यांच्या समवेत हभप घुले बाबांचे विद्यार्थी असलेल्या महाराज मंडळींनी प्रतिमेस पुष्पांजली अर्पण करून त्यांच्या स्मृतीस अभिवादन केले.पुण्यतिथी सोहळ्याच्या निमित्ताने हनुमान चालीसाचे सामूहिक वाचन वग्रंथराज ज्ञानेश्वरी ग्रंथातील १२ व १३ व्या अध्यायाचे सामूहिक पारायणकरण्यात आले. यावेळी बोलतांना पांडुरंग महाराज घुले म्हणाले की संत जीवन हे दैदिप्यमान व उंच शिखरावर पोहचले आहे,संत जीवन हे अष्टपैलू हिऱ्यासारखे असून समाज उद्धारासाठी उपकारक असे असते,क्षणाक्षणाची केलेली चांगली कृती ही मनुष्याला पुण्याईच्या प्राप्तीकडे नेणारी असते त्यामुळे संत भेटण्याकरता जीवनात पुण्य प्राप्त करा,संतांच्या आलिंगणातच सामर्थ्य असून त्यातून मोक्षाची प्राप्ती होते त्यामुळे संताना डावलून तीर्थयात्रेला जाऊ नका,सर्व तीर्थे व पर्वकाळ ही संतांच्याच चरणापाशी असतात,संतांची केलेली देवाला प्राप्त होत असल्याने संत महिमा अगाध असल्याचे त्यांनी सांगितले

यावेळी झालेल्या पुण्यतिथी सोहळ्याच्या प्रसंगी देवगड संस्थानचे प्रमुख महंत राष्ट्र संत गुरुवर्य श्री भास्करगिरीजी महाराज,संत ज्ञानेश्वर महाराज संस्थानचे प्रमुख वेदांताचार्य हभप श्री देविदासजी महाराज म्हस्के शास्त्री,गिरी आश्रमाचे महंत श्री कैलासगिरीजी महाराज, गोणेगाव चौफुला येथील रामकृष्ण आश्रमाचे प्रमुख महंत वेदमूर्ती भगवान महाराज जंगले शास्त्री,रामायणाचार्य नंदकिशोर महाराज खरात,बाळकृष्ण महाराज सुडके, कृष्णा महाराज हारदे,संत ज्ञानेश्वर महाराज देवस्थानचे अध्यक्ष पांडुरंग अभंग, अंजाबापू महाराज कर्डीले,रामेश्वर महाराज कंठाळे,शुभम महाराज कांडेकर,गणेश महाराज आरगडे,चांगदेव महाराज काळे, गहिनीनाथ महाराज आढाव,हरी महाराज भोगे,श्री हरी महाराज वाकचौरे,राम महाराज खरवंडीकर, ज्ञानेश्वर महाराज हजारे,राजेंद्र महाराज आसने यांच्यासह नेवासा तालुक्यातील महाराज मंडळी व भाविक भक्त मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**संत भेटण्याइतके तरी पुण्य जीवनात प्राप्त करा : गुरुवर्य श्री पांडुरंगजी महाराज घुले**



आरती वसंत ज्ञानेश्वर माऊलींच्या पसायदानाने पुण्यतिथी सोहळ्याची सांगता करण्यात आली.यावेळी पांडुरंग महाराज घुले व देवगडचे महंत गुरुवर्य श्री भास्करगिरीजी बाबांचे संतपूजन करण्यात आले गोंधवणी येथील ज्ञानाई गुरूकुलचे प्रमुख हभप ऋषिकेश महाराज वाकचौरे व गंगापूर तालुक्यातील लखमापूर राम कृष्ण भक्तीधामचे महंत योगीराज दादा महाराज वायसळ यांच्या वतीने उपस्थित संत मंडळींसह वारकरी शिक्षण संस्थेच्या कीर्तनकार व भाविकांना महाप्रसादाचे वाटप करण्यात आले.